केंद्र पुरस्कृत भारत सरकार शिष्यवृत्ती योजना या योजनेंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता पुरवणी मागणीअंतर्गत लेखाशिर्ष क्र. २२२५ सी ८९४ व लेखाशिर्ष क्र. २२२५ सी ९०२ खालील अर्थसंकल्पित निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१५/प्र.क्र.०८ /कार्यासन.६

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

तारीख: - २१ जानेवारी, २०१६.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८२/अर्थ-३, दि.३०.३.२०१५.

२) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.४.२०१५.

३) वि. वि, शासन परिपत्रक क्र.पूरक २०१५/प्र.क्र.२०१ /अर्थ-३, दि.०१.०१.२०१६.

४) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं- २०१५/प्र.क्र. ८५ /अर्थ-३, दि.१२.०१.२०१६.

५) आदिवासी विकास विभाग नस्ती क्र.पुरक- २०१५/ प्र.क्र.३५२/ कार्या-१२.

६) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, समक्रमांक दि. १८-०१-२०१६.

शासन निर्णय-

केंद्र शासन पुरस्कृत पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना मागणी क्र. टी-५, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०२, अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, (०१ (५०) भारत सरकारची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (२२२५ सी ८९४) व लेखाशिर्ष क्र. २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०२, अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना, (०२) (२८) भारत सरकारची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (२२२५ सी ९०२) या लेखाशिर्षांखाली अनुक्रमें रु. १०.०० कोटी व रु. ५.४८ कोटी अशा एकुण १५.४८ कोटी इतक्या निधीची **" भारत सरकारची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती "** या प्रयोजनार्थ डिसेंबर, २०१५ च्या अधिवेशनात पुरक मागणी मंजूर करण्यात आलेली आहे.

वाचा क्र. ४ येथील दि. १२-०१-२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये ३४- शिष्यवृत्ती या उद्दिष्टाकरिता १०० % तरतूदी वितरित करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यामुळे वाचा क्र.६ येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधी व्यतिरिक्त उर्वरित शिल्लक असलेला निधी लेखाशिर्ष टी-५, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०२, अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, (०१ (५०) भारत सरकारची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (२२२५ सी ८९४) खाली **रु.५००.०० लक्ष (रुपये पाच कोटी फक्त)** तर लेखाशिर्ष क्र. २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०२, अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना, (०२) (२८) भारत सरकारची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (२२२५ सी ९०२) खाली **रु. २७४.०१५ लक्ष (रुपये दोन कोटी चौऱ्याहत्तर लाख एक**

हजार पाचशे फक्त) अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास वाचा क्र.३. तसेच ४ मधील अटी व शर्तींची पुर्तता करत असल्याने शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. **उपरोक्त वितरीत केलेला निधी या प्रकल्पाच्या मंजूर प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत करण्याची तसेच त्यानुषंगाने निधी खर्च करण्यासंबंधीच्या नियमांचे पालन करण्याची दक्षता नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी**.

३. सदर वितरीत निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BEAMS) खर्चासाठी नियंत्रक अधिकारी यांना सुपूर्द करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी यांनी वितरित निधीच्या मर्यादेत व वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं- २०१५/ प्र. क्र. ८५ /अर्थ-३, दिनांक १७-०४-२०१५ व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण- २०१५/ प्र.क्र. ३४ / कोषा. प्रशा. ५, दि. २४-०७-२०१५ मधील अटी व शर्तींची पुर्तता करण्याची दक्षता घ्यावी.

४. सदर आदेश वित्त विभागाच्या वाचा क्र. ३ व ४ नुसार विभागास प्राप्त अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्याwww.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201601211405326924 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhagwan Maruti Sawant

Digitally signed by Bhagwan Maruti Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8ee89eb0aec64f8bc0bdf8d85ddb4706d35abd8b73c618e114ee98d5c9ecf57b, cn=Bhagwan Maruti Sawant
Date: 2016.01.21 15:03:31 +05'30'

भगवान सावंत
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
२. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग.
४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.

५. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६. विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ पुणे.
७. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. कार्यासन अधिकारी, कार्यासन- १२, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.